International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# सामाजिक संशोधनातील विषय निवड :- एक दृष्टिकोन

प्रा.विलास टिळेकर
मुधोजी महाविद्यालय, फलटण
*Corresponding Author-* प्रा.विलास टिळेकर

**प्रस्तावना :**

मनुष्य हा विचारशील प्राणी आहे.मानवाला निसर्गत:च चिकित्सक व्रत्ती हा गुण मिळाला आहे. म्हणून तो सामाजिक घटनांचा शोध घेण्याचा निरंतर प्रयत्न करत असतो. या प्रयत्नातूनच तो आपल्या चिकित्सक व्रत्तीचा विकास करतो.जागतिकीकरणाच्या युगात संशोधकांनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. मानवाच्या बुद्धीचा,ज्ञान साधनेचा प्रत्यय विविध संशोधनामुळे प्रकट होत असतो.संशोधन प्रक्रियेने मानवी जीवनातील सर्वच व्यवहार ,विविध क्षेत्रे व्यापली गेली आहेत. त्यामुळे संशोधन ही प्रक्रिया व्यापक बनलेली आहे.सामाजिक संशोधन हे 'समाज आणि संशोधन'या दोन गोष्टींशी निगडीत आहे. समाजामध्ये घडणाऱ्या विविध घटणा,व्यवहार, सिध्दांत व नविन ज्ञान यांच्याशी संबंधित असणाऱ्या संशोधकांनाला सामाजिक संशोधन म्हणतात. संशोधन करत असताना संशोधन विषयाची निवड ही बाब अतिशय महत्त्वपुर्ण असते.एखाद्या विषयाचे संशोधन करताना त्याची निवड का गरजेची आहे व त्या विषयाचे महत्त्व या संदर्भाने त्या त्या विषयाचा विचार केला जाणे गरजेचे आहे. संशोधनामध्ये विषय निवडीकडे दुर्लक्ष करून चालत नाही. त्यासाठी संशोधन विषयाची काही गोष्टींचा सविस्तरपणे विचार करावा लागतो.

**संशोधनातील विषय निवड : -**

संशोधन करायच आहे पण नेमक्या कोणत्या विषयावर कराव ?असा प्रश्न संशोधनकत्यास पडतो.संशोधनासाठी कोणता विषय निवडावा याबाबत विविध मतप्रवाह आहेत. तसे पाहीले तर संशोधनासाठी कोणताही विषय चालू शकतो.अभ्यास करण्याची क्षमता, जिद्द, चिकाटी यांच्या आधारे कोणताही विषय संशोधनाच्या कक्षेत घेता येतो.तरीही संशोधनासाठी विषय निवडताना काही मुद्दे अभ्यासणे क्रमप्राप्त ठरते.

१) **वाचन व अभ्यास : -**

दैनंदिन व्यवहारात आपणास येणारा एखादा अडथळा अथवा असमाधानकारक स्थिती यातूनच विषय निवडीस सुरुवात होते. विषय निवडीचे स्त्रोत म्हणजे वाचन व अभ्यास होय.तसेच संशोधनाचे शब्दकोश, संशोधन विषयक नियतकालिके, बुलेटीन,हस्तपुस्तके, मार्गदर्शिका,गोषवारे इत्यादी विविध स्त्रोतातून संशोधकाला आपल्या विषय निवडीस चालना मिळू शकते.

**२) संशोधकाची आवड : -**

संशोधन कार्य करत असताना विषय निवड ही खपच महत्वपुर्ण बाब आहे.संशोधकाला ज्या विषयामध्ये रस आहे अशा समस्येतून जर विषय निवड केली तर संशोधकाचा उत्साह वाढतो व संशोधक त्या कार्यामध्ये पुर्णत:कार्यमग्न होतो. परंतु जर विषय आवडीचा नसेल तर त्यामध्ये उत्साह राहत नाही व संशोधन कार्य रटाळ होण्याची शक्यता निर्माण होते. म्हणून संशोधकाची आवड आणि त्याची जिज्ञासा या गोष्टी महत्वपूर्ण आहेत.

**३) विषयाची नाविन्यता : -**

संशोधनासाठी विषय निवडताना तो विषय नविन असणे ही एक महत्त्वपूर्णबाब आहे. निवडला जाणाऱ्या विषयात काही नाविण्यपूर्ण प्रयोग किंवा नवीन सिध्दांत अथवा विचार मांडायला किती संधी प्राप्त होत आहे याचा अंदाज संशोधक विद्यार्थ्यांस घ्यावा लागतो.

**४) तज्ञ व अनुभवी व्यक्तीबरोबर चर्चा : -**

संशोधनासाठी विषय निवडताना संशोधकाला मार्गदर्शकाची गरज दिशादर्शक असते.संबंधीत अध्ययन व अध्यापन क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्तीबरोबर केलेली चर्चा संशोधनाच्या विविध पैलूंवर नजर टाकणारी ठरते.

**५) माहितीची उपलब्धता : -**

विषय निवड करत असताना त्या विषयाचीसखोल माहिती उपलब्ध असेल तर संशोधन कार्यात अडथळे निर्माण होत नाहीत .या गोष्टीची खातरजमा करुनच विषय निवडला जाणे गरजेचे आहे. जर संदर्भ किंवा माहिती उपलब्ध नसेल तर संदर्भसूचीमध्ये देण्यात अडथळे निर्माण होतात. यासाठी संशोधकास विद्यापीठ, महाविद्यालयीन व तत्सम ग्रंथालयांचा उपयोग होईल. तसेच इंटरनेटच्या माध्यमातून, वेबसाईटवरून विषयासंदर्भातील माहीतीची उपलब्धता पाहता येते व संशोधन कार्य सुलभतेने पार पाडता येते.

**६) कालबाह्यता : -**

संशोधन विषयाची निवड करत असताना संबंधित विषयाची कालबाह्यता लक्षात घेणे ही बाब खूपच आवश्यक आहे. मानवी समाज जीवन हे परिवर्तनशील आहे. त्यामुळे असे काळाच्या ओघात काही विषय कालबाह्य ठरतात त्यामुळे असे कालबाह्य ठरणारे विषय न निवडता सद्य स्थिती लक्षात घेऊन विषयाची निवड करणे आवश्यक आहे.

**८) ज्ञानात भर टाकणारा : -**

एखाद्या विषयावर जर संशोधन भरपुर झाले असेल तर त्यावर अजून किती संशोधन करायचे हा प्रश्न उदभवू शकतो व त्यामुळे तोच तो पणा येतो म्हणून विषय निवडताना सामान्यत: तो ज्ञानात नवीन भर टाकणारा असावा.तसेच तो औत्सुक्य निर्माण करणारा असावा.

**८) विषयाची व्याप्ती : -**

विषयाची व्याप्ती हा मुद्दा संशोधनकर्ताच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. विषय निवडत असताना त्यास अत्यंत दक्ष रहावे लागते. संशोधन कर्ताच्या विषय निवडीवर त्याचे पुष्कळसे भवितव्य अवलंबून असते. म्हणून संशोधन करताना विषयाची व्याप्ती अति व्हायला नको कारण त्यामुळे संशोधन कार्य अत्यंत क्लिष्ट होऊन ते कार्य पुर्णत्वास नेहता येणे अवघड होते. याच प्रमाणे विषय व्याप्ती अतिशय कमीही नसायला हवी कारण अशा वेळी लिखाण काय करावे असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. उपलब्ध कालावधीचा व कोणत्या पदवीसाठी विषय निवड करायची आहे याचा विचार करून विषयाची व्याप्ती निश्चित करून विषय निवड करावी.

**९) विषयाची उपयुक्तता : -**

विषय निवड करत असताना संशोधन विषयाची उपयोगीता किंवा मूल्य किती आहे या बाबींचा देखिल विचार करणे आवश्यक आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रामध्ये निवडला जाणारा विषय किती उपयुक्त ठरू शकतो यावर संशोधन कर्ताने विषय निवडताना विचार करणे महत्त्वाचे ठरते.

**१०) संशोधन कर्ताची क्षमता : -**

संशोधन कार्यात विषय निवड करतांना स्वतः ची क्षमता लक्षात घेणे अत्यंत गरजेचे असते.एखादी माहिती संख्यात्मक असते तर एखादी गुणात्मक असते. अशावेळी दोन्ही गुणांचे विश्लेषण करण्याची क्षमता संशोधकाकडे असणे महत्वाचे असते. अशाप्रकारे संशोधन विषयाची निवड करणे हा संशोधन कार्याचा कणा आहे. म्हणून संशोधन निवड करताना वरील काही निकषांचा आधार घेणे योग्य ठरते.

**संशोधन विषयाचे महत्व : -**

प्राथमिक कालावधी मध्ये संशोधशकर्ताला संशोधन विषय किंवा समस्येचे सखोल ज्ञान नसते. ज्या विषय क्षेत्रातील विशिष्ट बाब संशोधन कर्तास समस्यावत वाटते किंवा ज्या बाबी संबंधी प्रश्न, शंका उपस्थित होते त्यास सामान्यतः विषय निवड म्हणतात. याच गोष्टीला अभ्यास क्षेत्र, जिज्ञासा क्षेत्र असे ही संबोधले जाते. सामाजिक

जीवनात विविध प्रकारच्या समस्या असतात. परंतू सर्व समस्यांकडे संशोधन कर्ताचे लक्ष आकर्षित होत नाही किंवा सर्वच समस्या या त्याच्या अनुभवातून समस्या वाटत नाहीत.एखाद्या विषय क्षेत्रातील एखाद्यी बाब संशोधशकर्ताला समस्या वाटू लागते. तेव्हा ती समस्या किंवा विषय सामान्य असतो. एखादी समस्या किंवा विषय त्याला संशोधनाच्या दष्टीने महत्वाचा वाटतो. कारण त्याविषयी त्याला जिज्ञासा वाटते.

संशोधन ही प्रदिर्घ व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. विविध टप्प्यामधून संशोधनाचा प्रवास सुरु असतो.संशोधनाच्या अनेक पायऱ्या आहेत. संशोधन विषय निवडल्यानंतर तो विषय प्राप्त परिस्थितीत कसा महत्वपूर्ण ठरतो याचा उल्लेख संशोधकाला करावा लागतो. संशोधन कर्ताने निवडलेला विषय सर्व समावेशक असून आजच्या परिस्थितीत त्याचे महत्व किती आहे हे संशोधकाला पटवून द्यावे लागते. एखादा विषय महत्वाचा ठरण्यासाठी विभिन्न कसोट्यावर तो खरा उतरावा लागतो. सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्वच परिपेक्षामध्ये निवलेला विषय महत्त्वाचा असावा लागतो. प्राप्त परिस्थितीत निर्माण झालेल्या समस्यांवर उपायाच्या अनुशंगाने निवडलेल्या विषयात संशोधन होणे गरजेचे असते. यावरच त्या विषयाचे महत्त्व अवलंबून असते. योग्य विषय निवड केल्याने संशोधनकर्ताला योग्य ग्रहीतकाची मांडणी करता येते. त्यामुळे संशोधन कार्य पूर्ण करण्यास मदत होते व संशोधनास योग्य अशी दिशा प्राप्त होते.

**संदर्भ ग्रंथ : -**

१) डॉ. प्रदिप आगलावे - सामाजीक संशोधनाची मुलतत्वे , कल्पना प्रकाशन, कोल्हापूर.

२) डॉ. कऱ्हाडे बी.एम. – शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापरे प्रकाशन, नागपूर.

३) डॉ. विवेक पाटकर – संशोधन मार्गावरील प्रवास.

४) प्रा.डॉ. सुनील मायी – सामाजिक संशोधन पध्दती.

५) प्रा.निलम देवेंद्र धुरी – संशोधन पध्दती.

**प्रा.विलास टिळेकर**